दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.२८ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २३९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 28 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 239 | Pages 4 | Rate 4 Rs

## अमोल मिटकरींची जय पवारांसाठी लॉबिंग

**मुंबई**–सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आपल्या वाट्याला येणाऱ्या विधान परिषदेच्या एका जागेवर कुणाला पाठवणार? याविषयी राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे. या प्रकरणी राष्ट्रवादीच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक बोलावली आहे. पण तत्पूर्वीच आमदार अमोल मिटकरी यांनी या जागेसाठी जय पवार यांचे नाव सुचवून एकच धुरळा उडवून दिला आहे.राज्यातील विधान परिषदेच्या १० जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होणार आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार, सत्ताधारी भाजपच्या वाट्याला सर्वाधिक ६, तर शिवसेना व राष्ट्रवादीच्या वाट्याला अनुक्रमे २ व १ जागा येणार आहे. यात राष्ट्रवादीच्या एका जागेसाठी मोठी लॉबिंग सुरू आहे. सुनेत्रा पवारांनी या मुद्यावर तोडगा काढण्यासाठी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक बोलावली आहे. पण तत्पूर्वीच आमदार अमोल मिटकरी यांनी जय पवारांच्या नावाची शिफारस करून त्यांच्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

# बियाण्यांची डिजिटल नोंद ठेवण्यासाठी 'साथी' पोर्टलचा वापर बंधनकारक-कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांची खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळा

बियाणे उत्पादक कंपन्या व विक्रेते यांनी शेतक–यांना दर्जेदार आणि गुणवत्तापुर्ण बियाणे उपल्बध करुन द्यावेत, या खरीप हंगामापासून पहिल्यांदाच बोगस बियाणे ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार आहे.तसेच बियाणे कायदा व बियाणे नियंत्रण आदेशांचे काटेकोर पालन करावे. अन्यथा शेतक–यांच्या हितासाठी बनावट व निकृष्ट बियाणे उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला. तसेच बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी 'साथी' पोर्टलचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, बियाणे उत्पादक ते शेतकरी या संपूर्ण प्रक्रियेत बियाण्यांची नोंद डिजिटल साखळीच्या स्वरूपात करण्यात येणार आहे. शेतकरी हित हेच सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.आज पुणे येथे शासकीय कृषी महाविद्यालयाच्या डॉ.शिरनामे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांच्या खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.या कार्यशाळेत आगामी हंगामासाठीची पूर्वतयारी, बियाण्यांचे नियोजन, उपलब्धता व वितरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यंदा संभाव्य एल निनो पार्श्वभूमीवर पाण्याचा ताण सहन करणारे व कमी कालावधीतील वाढणारे वाण उपलब्ध करुन द्यावेत. तसेच जिल्हानिहाय पीक नियोजन मजबूत करुन जर पेरणी ऊशीरा झाली तर पर्यायी पीक नियोजन तयार करा अशा सुचनाही कृषी मंत्र्यांनी विभागाला दिल्या. याप्रसंगी कृषी राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद महासंचालक राहुल रंजन महिवाल,संचालक रफिक नाईकवाडी, संचालक सुनिल बोरकर, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

पुढे बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली खरीप हंगाम २०२६ यशस्वी करण्यात येईल. गुणवत्तापूर्ण बियाण्यांमुळे उत्पादनात साधारणतः १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते, हे लक्षात घेता प्रमाणित व दर्जेदार बियाण्यांची शंभर टक्के उपलब्धता असल्याची खात्री करणं आवश्यक आहे. राज्यात यंदा १४५.२० लाख हेक्टर पेरणी क्षेत्र अपेक्षित असून, त्यानुसार पिकनिहाय बियाण्यांची गरज निश्चित करण्यात आली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, खरीप २०२६ साठी राज्याची एकूण बियाणे गरज २०.१६ लाख क्विंटल इतकी असून, सध्या सुमारे २८.१४ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. म्हणजेच गरजेच्या सुमारे १४० टक्के साठा उपलब्ध असून बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत राज्य मजबूत स्थितीत आहे.यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, बियाण्यांची उपलब्धता समाधानकारक असली तरी ती योग्य वेळी आणि योग्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. गुणवत्ता, वेळेवर वितरण आणि पारदर्शकता यावर विशेष भर देणे गरजेचे आहे.केंद्र शासनाच्या 'साथी' पोर्टलच्या माध्यमातून बियाणे व्यवस्थापन अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत. लॉटनिहाय ट्रॅकिंग, सुलभ विक्री प्रक्रिया, एठझ एकत्रीकरण, फार्मर आयडी आधारित माहिती आणि SATHI-Sale Easy मोबाईल ॲप यांसारख्या सुविधा यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.
साथी प्रणाली म्हणजे बियाण्यांचा संपूर्ण हिशोब ठेवणारी व्यवस्था आहे. बियाणे कुठं तयार झालं, कुठं गेलं, कोणाला विकलं, सगळं पारदर्शक! म्हणजे आता शेतातून शेतकऱ्यापर्यंत सगळं ट्रॅक करता येतं. त्यामुळे सर्व उत्पादक, पुरवठादार व विक्रेते यांनी सदर प्रणालीचा सक्रीय वापर करावा अशा सुचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.



# विजय जोशी यांचा झुंजार पत्रकार पुरस्कार देऊन गौरव

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

शब्दांची शस्त्रे हातात घेऊन समाजहितासाठी अविरत लढणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान होतानाअभिमानाचे वातावरण निर्माण झाले. सामना वर्तमानपत्राचे जिल्हा प्रतिनिधी, राज्य शासनाच्या अधिस्वीकृती मंडळाचे लातूर विभागाचे अध्यक्ष तथा मराठी पत्रकार परिषदेचे माजी कोषाध्यक्ष विजय जोशी यांना परशुराम तेजोत्सव कार्यक्रमात झुंजार पत्रकार पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.हा प्रेरणादायी सोहळा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या हस्ते मान्यवर पत्रकारांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.



पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना विजय जोशी यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, ब्राह्मण समाजाच्या वतीने मिळालेला हा सन्मान माझ्या आयुष्यातील सर्वोच्च पुरस्कार आहे. हा पुरस्कार केवळ गौरव नसून माझ्यावर ठेवलेला विश्वास आहे. त्यामुळे माझी सामाजिक जबाबदारी आणि दायित्व अधिक वाढले आहे.
समाजातील बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजा सोबत खांद्याला खांदा लावून कार्य करीन.यावेळी निखिल लातूरकर यांनी आपल्या मनोगतात समाजासमोरील वास्तव मांडले. ते म्हणाले, ब्राह्मण समाजातील अनेक कुटुंबांचे आर्थिक प्रश्न गंभीर आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक आणि सज्जन शक्तींनी पुढे येऊन या उपक्रमात हातभार लावणे ही काळाची गरज आहे.
या प्रसंगी शहरातील विविध वर्तमानपत्राचे पत्रकार किरण कुलकर्णी, बजरंग शुक्ला, प्रल्हाद कांबळे, संतोष कुलकर्णी, प्रशांत गवळे, कृष्णा उमरीकर आणि रमेश देवडे यांची उपस्थिती लाभली.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष कुलकर्णी यांनी केले. सन्मान, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकारितेच्या मूल्यांचा संगम घडविणारा हा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

# 'मृद विज्ञान' आणि 'मशिन लर्निंग' चा संगम; परळी तालुक्यातील मांडव्याच्या सुपुत्राला पीएचडी प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधणे काळाची गरज बनली आहे. याच विचारातून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने गिरीश दशरथ चाटे यांना त्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधाबद्दल 'डॉक्टरेट' (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे.
गिरीश चाटे यांनी A Novel Framework for Soil image Classification Using Machine Learning या विषयावर आपले संशोधन पूर्ण केले. त्यांनी त्यांच्या संशोधनात मृद विज्ञान (Soil Science) आणि मशिन लर्निंग (Machine Learning) या दोन भिन्न क्षेत्रांची सांगड घालत मातीच्या वर्गीकरणासाठी एक नवीन 'फ्रेमवर्क' विकसित केले आहे. या तंत्रज्ञानामुळे मातीचे अचूक आणि जलद वर्गीकरण करणे शक्य होणार असून, याचा मोठा फायदा कृषी क्षेत्राला होऊ शकतो. विद्यापीठातील कॉम्प्युटर सायन्स विभागाचे डॉ. संदीप एस. भामरे यांचे त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून मोलाचे मार्गदर्शन लाभले. मूळचे मांडवा ता. परळी वैजनाथ जि. बीड येथील भूमिपुत्र असलेल्या गिरीश यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या संशोधनामुळे ग्रामीण भागातील तरुणांसमोर संशोधनाचे एक नवीन आदर्श निर्माण झाले आहेत.



## खरोसा गावातील अवैध्य दारुविक्री बंद करा सरपंच पुष्पा प्रशांत डोके यांची मागणी

# खरोसा गावातील अवैध्य दारु विक्री मुळे अनेकांचे संसार उद्धवस्त,तर अनेक कुटुंब उघड्यावर

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील खरोसा हे गाव सात ते आठ हजार लोकसंख्या असलेल गाव असुन गावात अवैध्य दारुविक्री होत असल्याने विद्यार्थी ते अबाल वृद्ध दारुच्या व्यसनाधीन झाल्याने अनेकांचे संसार उघडयावर आल्याच चित्र आहे ,अवैध्य दारु विक्री करणार्यांना अनेक वेळा समज देउन ग्रामपंचायतच्या वतिने अवैध्य दारु विक्रे त्यांच्या घरी स्टींग ऑपरेशनच्या माध्यमातुन दारु धरत पोलीसांना पाचारन करुन दारु धरुन देण्यात आली पण पुढे काहीच झाल नाही असा आरोप प्रशांत डोके यांनी केला असुन , दारु पकडुन पोलीसांच्या निदर्शनास आनुनही पुन्हा दारु विक्री जोरात चालु झाल्याच सरपंच ,उपसरपंचांनी सांगीतले ,वारंवार किल्लारी पोलीस स्टेशन , औसा उपविभागीय कार्यालय ,लातुर पोलीस अधिक्षक कार्यालय व राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे निवेदनाद्वारे दारु बंदीची मागणी करण्यात आली पण प्रशासन खरोसा गावची अवैध्य दारुची विक्री थांबवत नसल्याने गावात तळीरामाने अक्षरशा थैमान घातले असुन,खरोसा येथे मागील चार दिवसात दारुच्या त्रासाने नवर्यांच्या जाचाला कंटाळुन दोन चिमुकल्यासह आपल्या आईने विहीरीत उडी घेत आत्महत्या केली तरीही गावातील अवैध्य दारु विक्री बंद होत नाही ,खरोसा ग्रामपंचायत येथे वारंवार गावातील महिलांनी ग्रामपंचायत वर अवैध्य दारु बंदीसाठी आग्रह धरत वारंवार ग्रामपंचायत मध्ये येत सरपंच पुष्पा डोके यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतचा दारु बंदीसाठी ठराव घेउनही दारु बंद होत नसल्याने खरोसा ग्रामस्थ संतापले असुन ,खरोसा गावातील प्रत्येक घरोघरी तळीरामांचा वावर झाल्याने गावातील महिला हवालदिल झाल्या असुन ,महिला दररोज ग्रामपंचायतला येउन सरपंच ,उपसरपंच यांच्या कडे दारु बंदीची मागणी करत आहेत ,सर्व बाबी लक्षात घेउन खरोसा गावला व्यसनापासुन रोखण्यासाठी जिल्हा परीषद सदस्य तानाजीराव जाधव ,सरपंच पुष्पा डोके ,प्रशांत डोके ,उपसरपंच विशाल क्षिरसागर सह ग्रामपंचायत सदस्य , ग्रामस्थांनी यापुढे गावात अवैध्य दारुविक्री होउ दीली जाणार नाही यासाठी पुढाकार घेतला आहे, जर प्रशासनाने खरोसा गावातील दारुबंदी साठी कठोर पाउले उचलुन खरोसा गावची अवैध्य दारुविक्री व मटका नाही बंद केला तर येणार्या काळात आम्ही रास्ता रोको व उग्र अस उपोषण करणार असल्याचे सरपंच, उपसरपंच यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले ,,,



# लोणी येथे कन्यका परमेश्वरी वासवी माता जन्मोत्सव उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यातील लोणी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कन्यका परमेश्वरी वासवी माता जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. लोणी येथील आर्य वैश्य समाजाकडून कन्यका परमेश्वरी वासवी माता जन्मोत्सवा निमित्त दिपप्रज्वलन करून कुंकम- अर्चन पुजा करण्यात आले यावेळी लोणी, हनेगाव,वझर,कुडली, मरखेल, येथील आर्य वैश्य समाज बांधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री बालाजी विठ्ठल पोकलवार, डॉ.आनंद चिद्रावार, बालाजी रामराव पोकलवार, मानसी अर्बन बँकेचे संस्थापक नारायण शिंदे,राम वटटमवार, विलास वटटमवार, सतीश वटटमवार, राहुल गादेवार, अशोक कोमावार, दत्तात्रय वटटमवार, संतोष बलशेटवार, यांची उपस्थिती होती.
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश मुक्तावार, संजय धंपलवार, बालाजी कटकमवार, नागनाथ चिद्रावार,लक्ष्मीकांत चिद्रावार, गंगाधर चिद्रावार, दत्तात्रय चिद्रावार, बालाजी चिद्रावार,प्रशांत चिद्रावार, निशांत चिद्रावार, विनायक चिद्रावार,किरण धंपलवार,व सौ.पदमावती कटकमवार, सौ.सुनिता धंपलवार,सौ.रूपा चिद्रावार, रेश्मा चिद्रावार, श्रध्दा चिद्रावार, पुष्पा चिद्रावार, संगीता चिद्रावार,मंजूशा चिद्रावार, आश्विनी चिद्रावार, यांनी परिश्रम घेतले.

# ताडोबा हे निसर्गाचे वरदान; आगरझरी-मोहर्लीला पर्यावरणीय ‘मॉडेल व्हिलेज’ बनवू-आ.मुनगंटीवार

## आ.मुनगंटीवार यांच्या हस्ते पद्मापूर प्रवेशद्वाराचे लोकार्पण; ताडोबा पर्यटन विकासाला नवी गती

### रस्ते, सौंदर्यीकरण आणि स्थानिक रोजगाराला प्राधान्य देत ताडोबाला आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर नेण्याचा संकल्प





**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी, ताडोबा हे निसर्गाचे वरदान असून आगरझरी-मोहर्लीला पर्यावरणीय मॉडेल व्हिलेज म्हणून विकसित करण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पद्मापूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या पद्मापूर प्रवेशद्वाराच्या सुशोभीकरणाचे अधिकृत उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ताडोबा पर्यटन विकास, रस्ते, सौंदर्यीकरण आणि स्थानिकांना रोजगारनिर्मिती यावर भर देत ताडोबाला आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून अधिक भक्कम स्थान मिळवून देण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला, उपसंचालक कुशाग्र पाठक, उपसंचालक (कोर) आनंद रेड्डी, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, उपकार्यकारी अभियंता विवेक अंबुले, शहर उपाध्यक्ष रामपाल सिंग, माजी जि. प. सदस्य गौतम निमगडे, माजी सभापती रोशनी खान, सुरेखा थोरात, अजय सरकार, मनोज सिंघवी, श्रीनिवास जंगम, मोहर्ली सरपंच सुनीता कातकर, चोरगाव सरपंच तृणाली धंदरे, अनिता भोयर, चंद्रकांत ढोडरे, शुभम गेडाम आदींची उपस्थिती होती.पद्मापूर प्रवेशद्वाराचे काम तसेच ताडोबाला जाणाऱ्या रस्त्याचे काम अत्यंत उत्कृष्ट, दर्जेदार आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आले. कमी खर्चात दर्जेदार काम पूर्ण करून ताडोबाच्या पर्यटन वैभवात भर घालणाऱ्या संबंधित कंत्राटदारांचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विशेष कौतुक करत अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, अशा गुणवत्तापूर्ण कामांमुळे ताडोबाची ओळख अधिक भव्य आणि आकर्षक बनत आहे.

आगरझरी गावात रस्त्याच्या बाजूचे सौंदर्यीकरण करण्यासाठी १ कोटी ८५ लाख ६२ हजार ८४७ रुपयांचे काम करण्यात आले. यामुळे जंगलातून प्रवास करताना पर्यटकांना झाडांवरील बिबट्या, विविध पक्षी, फुलपाखरे आणि निसर्गसौंदर्याचा आनंद घेता येणार आहे. आगरझरी गावाचे नाव देशभरातील पर्यटकांच्या ओठांवर राहील, अशा दर्जेदार पद्धतीने हे काम करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी विप्लोवराज सिंघवी यांचेही अभिनंदन करण्यात आले.ताडोबा ही निसर्गाची मोठी देणगी असून, वनमंत्री असताना या भागाचा विकास व्हावा यासाठी जीव ओतून काम केले, असे सांगताना आमदार मुनगंटीवार म्हणाले की, ताडोबा हे पर्यटन क्षेत्र आंतरराष्ट्रीय



स्तरावर पोहोचावे यासाठी ताडोबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले. चंद्रपूरच्या ताडोबा उत्सवामध्ये सहा विश्वसुंदरी सहभागी झाल्या आणि त्यामुळे ताडोबाची ओळख जागतिक स्तरावर पोहोचली.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रफळ सुमारे १७२५ चौरस किलोमीटर असून, संजय गांधी नॅशनल पार्कचे क्षेत्रफळ १०४ चौरस किलोमीटर आहे. नवीन ताडोबा विकसित करायचा असेल, तर महाराष्ट्राचे २३ वर्षांचे संपूर्ण बजेट खर्च करावे लागेल. त्यामुळे ताडोबा ही आपल्याला निसर्गाने दिलेली अमूल्य संपत्ती आहे. २०१४ नंतर येथे मोहर्ली गेट, गावांतील अंतर्गत रस्ते, बटरफ्लाय गार्डन यांसारखे अनेक विकास प्रकल्प राबविण्यात आले, याचाही आ. मुनगंटीवार यांनी आवर्जून उल्लेख केला.

आगरझरी आणि मोहर्ली ही दोन्ही गावे पर्यटकांच्या कायम स्मरणात राहतील. पुढील पाच वर्षांत ही गावे उत्कृष्ट पर्यावरणीय मॉडेल व्हिलेज म्हणून विकसित करण्यात येतील. याचा अभिमान गावकऱ्यांना तसेच देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांनाही वाटेल, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.पर्यावरण आणि पर्यटन हे वरदान ठरावे, या दृष्टीने कामे करण्यात आली. आज अनेकांच्या हाताला रोजगार मिळण्यामागे वाघ आणि ताडोबा हे प्रमुख कारण आहे. रिसॉर्ट, हॉटेल, जिप्सी आणि गाईड या क्षेत्रांमध्येही अधिक संधी निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले.

केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन तसेच केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्र्यांना ताडोबाचा ५० आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांमध्ये समावेश करण्याची विनंती करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. जगातील सर्वाधिक वाघ चंद्रपूर जिल्ह्यात आढळतात. वाघ हा पराक्रमाचे प्रतीक असून, ‘वाघांच्या जिल्ह्याचा’ आवाज कुठेही कमी पडू दिला जाणार नाही; विधानसभेतही ही गर्जना कायम राहील, असे आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. या विभागातील लोकांना न्याय देणे ही आमची जबाबदारी आहे. वाघांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या लोकांना, शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना, आदिवासी समाजातील बांधव-भगिनींना, अनुसूचित जाती, ओबीसी तसेच विशेषतः नारीशक्तीला कोणताही त्रास होऊ नये, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असेही आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.आगरझरीवासीयांनी प्रेमाने आणि उत्साहाने केलेल्या स्वागताबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आदिवासी नृत्य सादर करणाऱ्या तरुण-तरुणींमध्ये प्रचंड ऊर्जा जाणवल्याचे सांगत, देशातील कोणताही व्याघ्र पर्यटक ताडोबामध्ये येईल तेव्हा तो येथील आनंदासह अविस्मरणीय आठवणी घेऊन जाईल, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.ताडोबासाठी आणखी उत्तम नियोजन तयार करण्यात येणार असून, पर्यटकांच्या सोयी-सुविधांसोबतच या वनक्षेत्राचे संवर्धन करणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या सुविधाही वाढविण्यात येतील. ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य आणि सर्व लोकप्रतिनिधींसोबत कार्यशाळा घेऊन पुढील विकास आराखडा तयार केला जाईल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ताडोबा हे स्मार्ट आणि सुंदर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने तीन महत्त्वाच्या उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आल्याचे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले.

---

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- सीमा बाळासाहेब हावळे रा. मोरेवाडी यांना श्री.संतोष चंद्रकांत आगरकर रा.कानडीमाळी यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
सर्वे न.११८/१ खुला प्लॉट -----
वार्ड क्रं २ विभाग : धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व : ६.०९ मिटरचा रस्ता
पश्चिम: राहुल देशमुख
दक्षिण : व्यंकटेश बबन मुळे
उत्तर : ९ मीटरचा रस्ता
लांबी : पू.प.१२.०४० मि. रुंदी : ९.१४० मि.
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. ३५२५ दि. १२/११/ २०२४ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.
स .न .३५२५
दि.१२/११/२०२४
प्रमाणे नोंद घेणे आहे

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२२/४/२०२६
खरेदी खत अधारे
अर्जदाराचे नाव :- साक्षी संतोष सोळुंके रा. केज यांना श्री. १ ) सत्येंद्र देविदासराव पाटील
२ ) हारुण महंमद हुसेन ३ ) श्रीराम मधुकर देशपांडे
रा. केज यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
सर्वे नं.११९ खुला प्लॉट नं. ०८
वार्ड क्रं २ विभाग- धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व : प्लॉट नं. ०७
पश्चिम : प्लॉट नं.०९
दक्षिण : रस्ता
उत्तर : सत्वधर यांची जमीन
लांबी : पू.प. ४० फूट
रुंदी : द.उ. ३० फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. ४०५ दि.३/२/२०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
अर्जदाराचे नाव : १ ) पाशा अजिजोद्दीन इनामदार
२) फजलोद्दीन अजिजोद्दीन इनामदार रा.केज
यांना श्री. सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.१०५ खुला प्लॉट न.सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
वार्ड क्रं.३ विभाग- कानडी रोड
भाग नं.१ लांबी पु.प. २० फुट रुंदी द. उ. ३० फुट
भाग नं.२ लांबी पु.प. २० फुट रुंदी द. उ. ३० फुट
चर्तु:सिमा
पूर्व : सिंकदर अजिजोदीन इनामदार
पश्चिम : फजलोदीन इनामदार
दक्षिण : दर्गा कोचकशाहा
उत्तर : रस्ता
पूर्व : पाशा अजिजोदीन इनामदार
पश्चिम : शफाओदीन इनामदार
दक्षिण : दर्गा कोचकशाह
उत्तर : रस्ता
सिटीसर्वे व नोटरी वाटणी पत्र नं.१०४७ दि.१७/ ४/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
अर्जदाराचे नाव-१)शफाओद्दीन अजिजोद्दीन इनामदार
२) सादेक अजिजोद्दीन इनामदार रा.केज
यांना श्री. सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.१०५ खुला सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
वार्ड क्रं.३ विभाग- कानडी रोड
भाग नं.१ लांबी पु.प. २० फुट रुंदी द. उ. ३० फुट
भाग नं.२ लांबी पु.प. २० फुट रुंदी द. उ. ३० फुट
चर्तु:सिमा
पूर्व : फजलोदीन इनामदार
पश्चिम : सादेक इनामदार
दक्षिण : दर्गा कोचकशाहा
उत्तर : रस्ता
पूर्व : शफाओदीन इनामदार
पश्चिम : मोहसीन इनामदार
दक्षिण : दर्गा कोचकशाह
उत्तर : रस्ता
सिटीसर्वे व नोटरी वाटणी पत्र नं.१०४७ दि.१७/ ४/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि . / /
सिटी सर्वे व नोटरी वाटणी पत्र आधारे
अर्जदाराचे नाव : १ ) यासीन अजिजोदीन इनामदार
२) सिकंदर अजिजोदीन इनामदार रा.केज
यांना श्री. सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.१०५ खुला सिटी सर्वे नं.१८८९ व १८९२
वार्ड क्रं.३ विभाग- कानडी रोड
भाग नं.१ लांबी पु.प. २० फुट रुंदी द. उ. ३० फुट
भाग नं.२ लांबी पु.प. २० फुट रुंदी द. उ. ३० फुट
चर्तु:सिमा
पूर्व : जावेद महंमद शरीफ शेख
पश्चिम : सिकंदर अजिजोदीन शेख
दक्षिण : दर्गा कोचकशाहा
उत्तर : रस्ता
पूर्व : यासीन अजिजोदीन इनामदार
पश्चिम : पाशा अजिजोदीन इनामदार
दक्षिण : दर्गा कोचकशाह
उत्तर : रस्ता
सिटीसर्वे व नोटरी वाटणी पत्र नं.१०४८ दि.१७/ ४/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- दैवशाला सुरेश पन्नमवार रा.केज यांना श्री. विनोद ज्ञानोबा शिंदे रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
घर नंबर----- सर्वे न.१०२
वार्ड क्रं ४ विभाग :गणेश नगर
चतु:सिमा
पुर्व : राजाभाऊ नामदेव खडके
पश्चिम: पांडुरंग केरबा चव्हाण
दक्षिण : ज्ञानेश्वर लक्ष्मण मुळे
उत्तर : १५ फुटाचा रस्ता
लांबी : पु.प. २० फुट. रुंदी : द.उ.३० फुट
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. २८९७ दि. १२/८/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
सातबारा अधारे
अर्जदाराचे नाव :- हारुण महंमदहुसेन कुरेशी यांना श्री. सातबारा स.न.६/२/ऊ
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.६/२/ऊ खुला प्लॉट नं ----
वार्ड क्रं १० विभाग दर्गाह रोड
चर्तु:सिमा
पुर्व : रवि जोगदंड व अलाउद्दीन शेख
पश्चिम : रस्ता
दक्षिण : शमशोद्दीन ऐनोद्दीन शेख
उत्तर : अलाउद्दीन शेख
क्षेत्र ०-०१.६५ आर
सातबारा अधारे अर्ज दि.२२/४/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.
शपथपत्र क्र.२२
२०/४/२०२६

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- उर्मिला बालासाहेब वळसे रा. केज यांना श्री. १) कमल शिवाजी वळसे २ )बाळासाहेब धनराज वळसे
रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
सर्वे न. १७४ खुला प्लॉट -----
वार्ड क्रं २ विभाग : धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व : गावठाण ते जुना धारूर रस्ता(३३ फूट)
पश्चिम: गोरख लक्ष्मण थोरात
दक्षिण : कमलबाई व संभाजी वळसे
उत्तर : ज्ञानराधा बँक तर्फे कुटे
क्षेत्र ००-४० आर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. १४७ दि. २४/१/ २०२२ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.
लेआउट दि.१०/९/२०२५
प्रमाणे नोंद घेणे आहे

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव-प्राजक्ता नितीनकुमार लावंड रा. सोलापूर यांना श्री. शायदाबी नबीखाँ पठाण रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
सर्वे न. २५ खुला प्लॉट -----
वार्ड क्रं ५ विभाग : शिक्षक कॉलनी
चतु:सिमा
पुर्व : सौ. दांगट
पश्चिम: २० फुट रुंदीचा रस्ता
दक्षिण : बिबीशन गालफाडे
उत्तर : शेख ईसाक
लांबी : पु.प. ३३ फुट. रुंदी : द.उ.३३ फुट
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. १९५९ दि. २९/५/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- आशाबाई लाला पवार रा.केज यांना श्री. चंद्रकांत माधवराव दांगट रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
सर्वे न.१०८/अ वार्ड क्रं ४
विभाग : कानडी रोड
चतु:सिमा
पुर्व : चंद्रकांत माधवराव दांगट
पश्चिम: चंद्रकांत माधवराव दांगट
दक्षिण : अंबादास सत्वधर वगैरे
उत्तर : रस्ता
००-०१.१०
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. १०९४ दि. २२/४/ २०१६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

# समस्त कक्कय्या समाज महासंघाचे महाअधिवेशन उत्साहात संपन्न; उपवर्गीकरणाला विरोधाचा ठराव एकमताने मंजूर

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । दत्ता खंदारे**

समस्त कक्कय्या समाज महासंघाचे भव्य महाअधिवेशन रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी मनोहर जोशी विद्यालय प्रांगण, धारावी डेपो, पी.एम.जी.पी. संकुलजवळ, धारावी, मुंबई येथे मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाले.

महासंघाचे अध्यक्ष श्री. निवृत्ती सावळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महाअधिवेशनाचे उद्घाटन माजी केंद्रीय गृहमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे, माजी आमदार श्री. ज्ञानराज चौगुले, माजी आमदार श्री. धर्माजी सोनकवडे, माजी आमदार श्री. बाबुराव माने व उमरगा पंचायत समितीच्या सभापती सौ. आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व संत कक्कय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

प्रारंभी सरचिटणीस श्री.प्रकाश दरवेशी यांनी प्रास्ताविक केले.अध्यक्ष श्री.निवृत्ती सावळकर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी समाजातील बांधवांशी संवाद साधताना समाजातील एकजूट, शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व



आणि आपल्या तरुणांनी प्रगतीसाठी कसे हिरीरीने पुढे आले पाहिजे, यावर ना रामदास आठवले साहेबांनी विचार मांडून त्यांना मार्गदर्शन केले.तर सुशील कुमार शिंदे (माजी गृहमंत्री )यांनी सुद्धा या समाजाला आर्थिक विकास महामंडळ मिळावे म्हूणन मी सरकारला पत्र लिहले.परंतु त्याचा विचार केला गेला नाही. सरकार बदलत राहतात. पण अजूनही वेळ गेली नाही महामंडळ नक्कीच मिळेल अशी आशा त्यांनी अधिवेशनात व्यक्त केली.

महत्त्वाचे ठराव व मागण्या:

१.उपवर्गीकरणाला विरोध: अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणामुळे समाजाचे आरक्षण धोक्यात येईल, असा इशारा देत श्री. विठ्ठल खरटमल व डॉ. रायप्पा कटके यांनी विरोधाचा ठराव मांडला. तो एकमताने मंजूर करण्यात आला.

२.आर्थिक विकास महामंडळ: समाजाच्या आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी कार्याध्यक्ष श्री. हनुमंत सोनवणे यांनी केली. आमदार सौ. ज्योती गायकवाड यांनी महामंडळाला पाठिंबा जाहीर केला.

३.संत कक्कय्या भवन:मुंबईत येणाऱ्या समाजबांधवांसाठी 'संत कक्कय्या भवन' उभारण्याची मागणी उपाध्यक्ष श्री. अशोक खरटमल यांनी केली.

४.मासिक वर्गणी:तळागाळातील गरजू बांधवांच्या मदतीसाठी दरमहा १००रुपये वर्गणी जमा करण्याचा ठराव मंजूर झाला.

मान्यवरांचे विचार:

डॉ. पी. पी. पोळ यांनी संस्थापक श्री. मारुती सदाफुले यांच्या कार्याचा गौरव केला. ज्येष्ठ साहित्यिक ना. म. शिंदे म्हणाले, धारावी हे समाजाचे मूळ स्थान आहे. आपण आपली ओळख लपवू नये. महासंघाने 'एक गाव, एक संघटना' धोरण राबवून जनगणना करावी. श्री. मुकुंद सोनटक्के यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालत जाती-जातीत भांडणे लावणाऱ्यांना बळी पडू नका, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात श्री. निवृत्ती सावळकर म्हणाले, समाजासाठी शेवटपर्यंत लढत राहीन. प्रत्येक जिल्ह्यात कक्कय्या भवन उभारण्यासाठी प्रयत्न करणार. उपवर्गीकरणाच्या अन्यायाविरोधात लढा उभारू. त्यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

यावेळी समाजातील गुणवंतांचा समाजरत्न'व 'समाजभूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अधिवेशनास केंद्रीय मंत्री श्री. रामदास आठवले, आमदार सौ.ज्योती गायकवाड, नगरसेविका सौ. अर्चनाताई शिंदे, नगरसेवक श्री. भास्कर शेट्टी, नगर सेवक जोसेफ कोळी यांच्यासह हजारो समाजबांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. शशिकांत सोनवणे* यांनी केले तर श्री. मनोज शिंदे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने सांगता झाली.

# पाटसमध्ये भारनियमनावरून संताप महावितरणविरोधात आंदोलनाचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**पाटस । प्रतिनिधी**

येथील नागरिकांना सध्या महावितरणच्या भारनियमनाचा मोठा फटका बसत असून संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणच्या मनमानी कारभाराचा जाहीर निषेध करत लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संध्याकाळच्या वेळेतच वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अंधारामुळे साप, विंचू तसेच इतर कीटक घरासमोर व घरामध्ये शिरत असल्याच्या घटना वाढल्या आहेत. तसेच वीज नसल्याने मच्छरांचा त्रास वाढून आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिला यांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.या संदर्भात राष्ट्रीय फुले ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अमोल दादासो भागवत यांनी महावितरणच्या कारभारावर टीका केली. संध्याकाळच्या वेळेत भारनियमन करणे पूर्णपणे चुकीचे असून यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन



विस्कळीत झाले आहे. येत्या आठवड्याभरात भारनियमन रद्द न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.दरम्यान, येत्या ४ मे २०२६ रोजी (सोमवार) केडगाव येथील महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या आंदोलनात अमोल भागवत यांच्यासह अनिल नेवसे, इब्राहिम शेख व प्रदीप शेलार सहभागी होणार आहेत. भारनियमन रद्द केल्याचे लेखी पत्र मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.या आंदोलनाला पाटस व केडगाव परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा द्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. महावितरणने तातडीने याकडे लक्ष देऊन वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीमध्ये गरुड भरारी घेण्याची क्षमता-जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या दहा हजार शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याच्या धोरण अंतर्गत करमाळा तालुक्यात स्थापन झालेल्या राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीची वाटचाल प्रेरणादायी असून सह्याद्रीच्या धर्तीवर सोलापूर जिल्ह्यामध्ये काम करणारी सशक्त कंपनी म्हणून राजे रावरंभा कंपनी भविष्यात पुढे येईल असा आशावाद सोलापूर जिल्ह्याचे कृषी अधिक्षक शुक्राचार्य भोसले यांनी दि.२४ रोजी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केला. कंपनीच्या विस्तारित नवीन युनिटच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर करमाळा तालुक्याच्या तहसीलदार शिल्पा ठोकडे, तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके ,डी.डी.एम नितीन शेळके ,वॉटरशेड ट्रस्टचे कांतीलाल गीते, जिल्हा परिषद सदस्य गणेश चिवटे, पंचायत समितीच्या सभापती पूजा ढेरे ,पंचायत समिती सदस्य भरत अवताडे, विवेक येवले ,सुजित बागल, अजय



कुमार बागल ,डॉ.अमोल गोफणे,लता तिटके,शोभा अंधळकर, दिनेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की,महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग शेतकऱ्यांसोबत आहेच. रोजगार हमी योजना, ठिबक अनुदान ,फळबाग अनुदान योजना, अवजार बँक अनुदान योजना इ. योजनांच्या माध्यमातून सरकार आपल्या सोबत असेल तिथं सरकारच्या मदतीने आणि जिथे सरकार मदतीला नसेल अशा ठिकाणी शेतकरी कंपन्यांनी एनजीओच्या मदतीने काम करणे ही काळाची गरज आहे. जुन्या सहकाराचे आजचे बदललेले रूप म्हणजे शेतकरी उत्पादक कंपनी आहे.शासन आणि शेतकरी यांच्यातील कणा म्हणजे शेतकरी उत्पादक कंपनी आहे. येणारा काळ हा या कंपन्यांचा काळ असल्यामुळे शेतकऱ्यांनी कंपनीचे सभासद होणे गरजेचे असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट चे कांतीलाल गीते म्हणाले की, शासन अनुदान तसेच वॉटर, वॉलमार्ट यांच्या सहकार्याने मिळालेल्या निधीचा अतिशय योग्य उपयोग राजे रावरंभा कंपनीने केल्यामुळे आज कंपनी योग्य दिशेने वाटचाल करत आहे.यावेळी डीडीएम नितीन शेळके,तहसीलदार शिल्पा ठोकडे, पंचायत समिती सभापती पूजा ढेरे, पंचायत समिती सदस्य भरत अवताडे यांच्यासह आय सी एल ,जय किसान ,आर्या शक्ती या कंपनीच्या प्रतिनिधींनी शेती,माती, खते याबद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कंपनी अध्यक्ष डॉ. विकास वीर यांनी केले.सूत्रसंचालन अरुण चौगुले यांनी तर आभार प्रा. बिभीषण मस्कर यांनी मानले.

## कंपनीच्या या शेतकरी सुविधा बेंद फाटा येथे सुरू

**ॲग्रो मॉल, टिशू कल्चर केळी व डाळिंब रोपे, ठिबक, पीव्हीसी पाईप, रासायनिक खते व औषधे,जैविक निविष्ठा – निर्मिती, विक्री व मार्गदर्शन ,विषमुक्त धान्य खरेदी विक्री, कोल्ड स्टोरेज, ६० टन क्षमतेचा वजन काटा, गांडूळ बेड युनिट, १० ड्रम युनिट, फवारणी ड्रोन, पावर टेलर, विडर, ग्रास कटर ,एचटीपी पंप, वेदर स्टेशन, अंकुश पाटील तंत्रज्ञान औषधे या सुविधांचा शुभारंभ झाला. या सर्व सुविधा शेतकऱ्यांसाठी आता उपलब्ध होणार आहेत.**

# राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या विशेष निरीक्षकांकडून सामूहिक वनहक्क क्षेत्रांची पाहणी

**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे विशेष निरीक्षक (आदिवासी कल्याण) आर. हेमंथ कुमार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील सामूहिक वनहक्क क्षेत्रांचा महत्त्वपूर्ण अभ्यास दौरा करून आदिवासी भागातील विविध प्रश्नांचा सखोल आढावा घेतला.हेमंथ कुमार यांनी चंद्रपुर व चिमुर यांचे संयुक्त विद्यमाने सामुहिक वनहक्क क्षेत्रात काम करणा-या स्वंयसेवी संस्था, जिल्हा व तालुका व्यवस्थापक यांची बैठक घेऊन वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीत येणाऱ्या समस्या व भेट द्यावयाच्या ठिकाणाची माहिती जाणून घेतली. सामुहिक वनहक्क प्राप्त मौजा महादवाडी (ता. चंद्रपुर) येथे प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर त्यांनी ग्रामस्थाशी संवाद साधला. सामुहिक वनहक्क क्षेत्रात काम करीत असतांना येणाऱ्या समस्या जाणुन घेऊन त्याचे निराकरण करण्यात आले. तसेच चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र या संस्थेला भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थेतील फायर फायटिंग व्यवस्था तंत्रशुध्द व अचुक असावी. बांबु लागवड आणि उत्पादनासाठी लघु व सुक्ष्म उद्योग अंतर्गत काही नियोजन करता येते का, त्याचा अधिकाऱ्यांनी अभ्यास करावा, बांबु लागवड, उत्पादन व त्यातून कौशल्य विकास या संदर्भात नियोजन करावे, बफर झोनमधील शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी प्रवृत्त करावे, अशा सुचना केल्या.

यावेळी त्यांनी वसतीगृह, इंडक्श्न किचन, इलेक्टॉनिक वस्तु, आग प्रतिबंधक व्यवस्था, पाणी शुध्दीकरण, इंटरनेट व वायफाय सुविधा डिजिटल लॅब, टिशु कल्चर लॅब, ऑडिटोरियम, सौर उर्जा व्यवस्था, परिसरात सादररीकरणासाठी डिस्प्ले युनिटस, एक्जीबिशन हॉल, आरोग्य केंद्र क्रीडा सुविधा, कम्प्युटर लॅब, लायब्ररी आदींची पाहणी केली.

यानंतर मौजा पाचगाव या सामुहिक वनहक्क प्राप्त गावाला भेट देऊन तेथील सामुहिक वनहक्क क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली. बांबुची लागवड, बांबु कटींग कशी व कोणत्या महिन्यात करावी, बांबु कटींगकरिता आधुनिक अवजाराचा कसा वापर करावा, तसेच बांबुचे संकलन कशाप्रकार करावे या बाबत तेथील नागरिकांशी विस्तृत चर्चा करण्यात आली.

श्री. हेमंथ कुमार यांनी आदिवासी भागातील परिस्थिती प्रत्यक्ष जाणून घेण्यावर विशेष भर दिला. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत कितपत प्रभावीपणे पोहोचत आहे, याचा त्यांनी आढावा घेतला. या संदर्भात बोलताना हेमंथ कुमार यांनी सांगितले की, आदिवासी भागातील विकास आणि मानवाधिकारांचे संरक्षण यामध्ये समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना व कल्याणकारी उपक्रमांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आणि आदिवासी बांधवांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही आयोगाची प्राथमिकता आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा : गुरुवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. सदर बैठकीला जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार आदी उपस्थित होते. बैठकीदरम्यान आदिवासी भागातील विकासकामे, वनहक्क प्रकरणांची स्थिती, सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समित्यांचे गठण, त्यांचे बँक खाते, सामुहिक वनहक्क व्यवस्थापन आराखड्यांची स्थिती तसेच शासनाच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२२/४/२०२६
खरेदी खत आधारे
अर्जदाराचे नाव :- महादेव प्रल्हाद कराड
रा. पिराचीवाडी यांना श्री. बाबासाहेब सुर्यभान मुंडे रा. दहिफळ वडमाऊली
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर २३४८ सर्वे.न.१०२
वार्ड क्रं ४ विभाग- वसंत विद्यालयाच्या मागे
चर्तु:सिमा
पुर्व : प्रभाकर अंबाड यांचा प्लॉट
पश्चिम : ड. एन आर शिंदे
दक्षिण : १७.५ फुटाचा रस्ता
उत्तर : १५ फुटाचा रस्ता
लांबी : द.उ. १७.५ फुट रुंदी : पु.प. ३५ फुट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. ६०६ दि.२६/२/२०२६ आहे.अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**–नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२२/४/२०२६
सातबारा व नोटरी शपथ पत्र अधारे
अर्जदाराचे नाव :- सुनील निवृत्ती लोंढे
रा.केज यांना श्री सातबारा सर्वे नं.२९८/अ/३
यांचे कडुन खालील चतु :सिमेच्या आतील
सर्वे न.२९८/अ/३ वार्ड क्र.१५
विभाग बोबडेवाडी रस्ता
चतु:सिमा
पुर्व : रस्ता
पश्चिम : प्रेमचंद बाबुराव देवधारे
दक्षिण : प्रेमचंद बाबुराव देवधारे
उत्तर : गुरुबा नरसु लोंढे
लांबी पु.प.३३ फुट रुंदी द.उ.३३ फुट
सातबारा व नोटरी शपथ पत्र नं. ४०५ दि. १७/४/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**–नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- बलभीम पांडुरंग राऊत
रा. केज यांना श्री.विनोद ज्ञानोबा शिंदे
यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
सर्वे न.२२८/१ खुला प्लॉट -----
वार्ड क्रं.----विभाग : अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : बिबीशन शंभूराव इंगळे
पश्चिम: संजय श्रीहरी साखरे
दक्षिण : केज अंबाजोगाई रोड
उत्तर : रस्ता
क्षेत्र ०.०२.६९ आर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. ११५६ दि. १३/४/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**–नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .१२/४/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- हारीभाऊ गणपती गिते
रा. साळेगाव यांना श्री. शांतीनाथ बाबाराव चौभारकर
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर ----- सर्वे न.२५
वार्ड क्रं ५ विभाग- शिक्षक कॉलनी
चतु:सिमा
पुर्व : सुधाकर रघुनाथ गिते
पश्चिम : चंद्रकांत विठ्ठल सारूक
दक्षिण : रस्ता
उत्तर : मिराबाई गिते
लांबी : पू.प.२६.६६ फुट
रुंदी : द.उ. ४८ फुट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. २२५० दि.२१/८/२००९ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**–नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि .२३/४/२०२६
खरेदी खता आधारे
अर्जदाराचे नाव :- प्रकाश दत्तू जाधव
रा. केज यांना श्री.गंगा भिवाजी राऊत
रा.केज यांचे कडुन खालील चतु:सिमेच्या आतील
सर्वे न. १०३/अ वार्ड क्रं. ४
विभाग : वसंत विद्यालयाच्या मागे
चतु:सिमा
पुर्व : सुदाम वैजनाथ चाटे
पश्चिम: मिराबाई सुरेश जाधव व कृष्णा मधुकर जाधव
दक्षिण : रस्ता
उत्तर : सुदाम वैजनाथ चाटे
लांबी : ----- रुंदी ००=०१ आर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं. १६६५ दि. १५/७/ २०१४ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**–नगरपंचायत कार्यालय ,केज**

# स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाला : पुष्प-७ वे

## माध्यमे ही केवळ माहितीचे साधन न राहता, ती लोकशाही मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि सत्यतेच्या आधारावर चालणारी असावीत–सुहास सरदेशमुख

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

युद्धाचे सर्वसामान्य परिणाम अत्यंत विनाशकारी आणि दीर्घकालीन असतात, जे केवळ लढणाऱ्या देशांवरच नाही, तर संपूर्ण जगाला विनाशाच्या दिशेने घेऊन जातात. युद्धामुळे मानवी संस्कृती आणि प्रगती कित्येक वर्षे मागे जाते. दुसऱ्या महायुद्धासाठी जबाबदार असलेला डॉल्फ हिटलर तसेच विन्स्टन चर्चिल हे युद्धाचे वार्ताहर व नंतर सूत्रधार झाले. बदलत्या काळात युद्धासाठी घातक शस्त्र तयार करण्याचे तंत्र विकसित झाले. युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वात होरपळणारी व्यक्ती म्हणजे महिला. या परिस्थितीत माध्यमांची भूमिका फार महत्त्वाची ठरते. परंतु सध्याचे चित्र पाहता सध्याचे जर्नालिझम हे हेल्थ नसून ते वेल्थ बनले आहे. आपल्या माईंडसेटचा ताबा माध्यमांनी घेतला आहे. माध्यमांचे देखील स्वतःच्या काही गरजा असतात. तरीही त्यांनी संवेदनशीलता टिकून ठेवणे गरजेचे आहे. युद्धाचे खरे वास्तव माध्यमांनी दाखवले पाहिजे. सध्याच्या काळामध्ये माध्यमे ही केवळ माहितीचे साधन न राहता, ती लोकशाही मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि सत्यतेच्या आधारावर चालणारी असावीत असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील सुहास सरदेशमुख यांनी केले. केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २६ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे समारोपाचे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. सुहास सरदेशमुख विशेष प्रतिनिधी दै. लोकसत्ता, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून दै. सकाळचे ज्येष्ठ पत्रकार श्री दिपकराव देशपांडे यांनी उपस्थिती दर्शवली.

इतर उपस्थित मान्यवरांमध्ये श्री. शहाजी चव्हाण तुळजाई प्रतिष्ठान, मतिमंद प्रकल्प आळणी, धाराशिव. जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजिलोद्दीन काजी तसेच संस्थेचे जेष्ठ संचालक युवराज दादा काळे आदी उपस्थित होते.कार्यक्रमासाठी लाभलेल्या उपस्थित पाहुण्यांचा परिचय स्व. विश्वंभर कोकीळ जीवन विकास व्याख्यानमालेचे कार्यवाह मेघशाम मंगरूळकर यांनी दिला. सातवे पुष्प गुंफताना युद्धजन्य परिस्थितीत माध्यमांची भुमिका. या विषयावर बोलताना सुहास




सरदेशमुख पुढे म्हणाले, युद्धजन्य परिस्थितीचा सर्वसामान्यवर परिणाम होतोच, परंतु उच्च शिक्षण घेणाऱ्या परदेशातील विद्यार्थ्यांवरही होतो. अशा परिस्थितीत अहिंसा हे मानव हिताचे शक्तीस्थान ठरते. राष्ट्रपिता महात्मा गांधींचा युद्धाला विरोध होता. सरहद्द गांधी म्हणून ओळखले जाणारे खान अब्दुल गफार खान हे गांधीजींचे सच्चे अनुयायी होते.

गांधीजींच्या सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वांचा त्यांच्यावर सखोल प्रभाव होता. त्यांनी पठाण समाजात शांतता व शिस्त रुजवण्यासाठी हिंसक समजल्या जाणाऱ्या वायव्य सरहद्द प्रांतात धर्माच्या नावावर फाळणी नको, या विचारासाठी आयुष्यभर लढा दिला. तेव्हा याप्रसंगी सुहास सरदेशमुख यांनी जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या अनेक व्यक्तिमत्त्वांच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला.

अध्यक्षीय समारोपात दिपकराव देशपांडे म्हणाले, सध्याच्या या युद्धजन्य परिस्थितीमध्ये माध्यमांची भूमिका अतिशय महत्त्वाचे ठरते. कारण युद्धजन्य परिस्थितीमध्ये माध्यम बॉण्ड्रीवर नसतात. त्यामुळे युद्धाचे खरे वास्तव माध्यमांनी दाखवले पाहिजे. युद्धामुळे फार मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होते. युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागतात. खरंतर राज्यकर्त्यांच्या अतिरेकामुळे स्वराष्ट्राची परिस्थिती बिघडते. शेवटी ते म्हणाले, सध्या सुरू असलेल्या युद्धामध्ये शाळेवर बॉम्ब हल्ला होणे ही अत्यंत लाजूराणी गोष्ट आहे. या परिस्थितीमध्ये भारताने घेतलेली तटस्थ भूमिका हा अहिंसेचाच भाग आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार व्यक्त करताना मेघशाम मंगरूळकर यांनी यावर्षी २६ व्या वर्षात पदार्पण केलेल्या स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेसाठी निमंत्रित सन्माननीय व्याख्याते व अध्यक्षांचे तसेच या कार्यक्रमाला आपल्या दैनिकातून प्रसिद्धी देऊन सहकार्य केलेल्या सर्व पत्रकार बंधूंचेही मनःपूर्वक आभार व्यक्त केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## मंडुबाई दत्तू लोंढे यांचे दिर्घ आजाराने निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील फुले नगर परिसरात वास्तव्यास असलेल्या स्व. मंडुबाई दत्तू लोंढे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्या आकाश लोंढे व विलास लोंढे सर यांच्या मातोश्री होत्या. दि. २५ एप्रिल रोजी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने लोंढे परिवारासह परिसरात शोककळा पसरली आहे.



आज सकाळी क्रांती नगर, केज येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक तसेच नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. मंडुबाई लोंढे यांच्या पश्चात मुले, सुना, मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## गंजपिर बाबाच्या यात्रेचे भव्य आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । ज्ञानेश्वर बनसोडे**

अहिल्यानगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथे सालाबाद प्रमाणे जागृत देवस्थान असलेले श्री गंजपिर बाबाच्या यात्रेचे भव्य दिव्य अशा प्रकारचे आयोजन टाकळीमिया समस्त ग्रामस्थ व यात्रा कमिटी गंजपीर बाबा यात्रोत्सव २०२६ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

गुरुवार दिनांक ३०/४/२०२६रोजी. सकाळी ८.०० वाजता बाबांचा जल अभिषेक व महापूजा होईल. नंतर त्याच दिवशी सायंकाळी ६ते१० संदल व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर शुक्रवार दिनांक १/४/२०२६ रोजी मुख्य यात्रोत्सवाचे भव्य दिव्य अशा प्रकारचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ६ते१० वाजेपर्यंत छबिना व चादर मिरवणुकीचा कार्यक्रम होणार आहे.


. टाकळीमिया येथील जागृत देवस्थान असलेले गंजपीर बाबाची यात्रा स्थळ= टाकळीमिया फैल गंजपिर बाबा दर्गा येथे होणार आहे. तरी कृपया परिसरातील भाविकांनी गंजपिर बाबाच्या दर्शनाचा लाभ घेऊन यात्रेची शोभा वाढवावी असे नम्र आवाहन टाकळीमिया समस्त ग्रामस्थ व यात्रा कमिटी गंजपिर बाबा यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## मोंढा भागात ट्रान्सफार्मर बिघाड; महावितरण यांच्या तत्परतेमुळे रात्री वीजपुरवठा सुरळीत

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आज गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास परळी शहरातील मोंढा परिसरातील डीपीला एका अज्ञात वाहनाची धडक बसल्याने ट्रान्सफार्मरमध्ये बिघाड झाला. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे दिवसभर मोंढा भागातील नागरिकांना वीजपुरवठ्याअभावी मोठा त्रास सहन करावा लागला.सध्या एप्रिल महिन्यातील कडक उन्हामुळे तापमान ४० अंशांपर्यंत पोहोचले असून, अशा परिस्थितीत वीज नसल्याने नागरिकांची अक्षरशः ससेहोलपट झाली. दरम्यान, महावितरणच्या (पॉवर हाऊस) कर्मचाऱ्यांनी भर उन्हात ट्रान्सफार्मर दुरुस्तीसाठी अथक प्रयत्न केले; मात्र तांत्रिक बिघाड गंभीर असल्याने तो तत्काळ दुरुस्त करणे शक्य झाले नाही.



या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी अभियंता श्री. राठोड यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ निर्णय घेत अंबाजोगाई येथून नवीन ट्रान्सफार्मर मागवून घेतला. सायंकाळपर्यंत नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आणि रात्री सुमारे ८ वाजता वीजपुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात आला.कडक उन्हात दिवसभर मेहनत घेऊन वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत असून, त्यांच्या या तत्पर सेवेसाठी आभारही व्यक्त करण्यात येत आहेत.

## शेख मुदस्सीर यांची 'सकल मुस्लिम युवक संघाच्या'प्रदेश संघटकपदी निवड

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी येथील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असलेले शेख मुदस्सीर नसीर यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या प्रदेश संघटक पदी निवड करण्यात आली आहे. ही निवड दिनांक २३ एप्रिल रोजी करण्यात असून आहे.शेख मुदस्सीर हे मागील अनेक वर्षांपासून समाजकारण आणि पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत. सामाजिक प्रश्नांची चांगली जाण, लोकांशी संवाद साधण्याची क्षमता आणि युवकांना एकत्र कौशल्य यामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक मुद्द्यांवर त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून, गरजूंना मदत करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि समाजात जागरूकता निर्माण करणे यामध्ये त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे.त्यांच्या या सातत्यपूर्ण कामाची तसेच सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेसोबत सुरुवातीपासून असलेल्या सहभागाची दखल घेत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांनी त्यांची प्रदेश संघटक म्हणून निवड केली आहे. या पदाच्या माध्यमातून राज्यभरातील युवकांना संघटित करून सामाजिक आणि संवैधानिक न्याय हक्कांसाठी लढा अधिक बळकट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.




निवडीबद्दल बोलताना शेख मुदस्सीर यांनी सांगितले की, 'ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची असून, सामाजिक अस्तित्व आणि संवैधानिक अधिकारांसाठी मी अधिक जोमाने काम करणार आहे. संघटनेच्या माध्यमातून राज्यातील युवकांना एकत्र आणून सकारात्मक बदल घडवण्याचा माझा प्रयत्न राहील.'दरम्यान, त्यांच्या या निवडीबद्दल विविध सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## प्रवक्ते राम कुलकर्णी गोपीनाथ गडावर नतमस्तक; परळी भाजपाकडून पहिला सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश प्रवक्तेपदी पुनर्नियुक्ती झाल्यानंतर राम कुलकर्णी यांनी आपल्या तिसऱ्या कार्यकाळाची सुरुवात गोपीनाथ गडावर नतमस्तक होत आशीर्वाद घेऊन केली. यानंतर परळी शहरात आगमन होताच भाजपाच्या वतीने त्यांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला.

प्रदेश प्रवक्ते पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर कुलकर्णी हे इंदौर येथे पक्षाच्या प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी झाले होते. बीड जिल्ह्यात परतल्यानंतर त्यांनी सकाळी गोपीनाथ गडावर जाऊन स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी बोलताना ते म्हणाले, गोपीनाथराव मुंडे यांचे माझ्या आयुष्यात अनन्यसाधारण



महत्त्व आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जवळपास ३० वर्षे काम करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. गोपीनाथ गडावर आल्यानंतर सकारात्मक दृष्टिकोनाने काम करण्यासाठी नवे बळ मिळते.

दरम्यान, परळीत आगमन झाल्यानंतर तालुका अध्यक्ष राजेश गीते यांच्या जनसंपर्क कार्यालयात कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. भाजपाचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव (अण्णा) गुट्टे यांनी, राम कुलकर्णी हे हाडाचे कार्यकर्ते असून त्यांनी संघर्षातून संघटनेत आपले स्थान निर्माण केले आहे. त्यांना उज्ज्वल भविष्य आहे, असे मत व्यक्त केले.

तालुका अध्यक्ष राजेश गीते यांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, रामभाऊंच्या कार्याचा आम्हाला अभिमान आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांसाठी अहोरात्र परिश्रम घेतले. तसेच नामदार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वासाठीही त्यांची लेखणी प्रभावीपणे काम करत आहे.या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते शिवाजी (अण्णा) गुट्टे, तालुका अध्यक्ष राजेश गीते, माजी पंचायत समिती सदस्य मारोतराव फड, भाजपा सचिव अनिल गुट्टे, सेलूचे सरपंच बाळासाहेब फड, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष धुराजी साबळे, प्रा. रविकांत कराड, गणेश होळंबे, केशव गीते आदी उपस्थित होते.

याच प्रसंगी अंबाजोगाई पंचायत समितीचे माजी सभापती नारायणराव केंद्रे व ज्येष्ठ नेते अशोकराव केंद्रे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच 'रामा टायर्स'च्या वतीने बाळासाहेब गीते यांनीही कुलकर्णी यांचा सन्मान केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077